**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांचा उलटतपास वादीचे सुविद्य विधिज्ञ श्री. एस. एन. बोरा यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही आमची वडीलोपार्जित मिळकत होती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, दावा मिळकत ही आमची वडीलोपार्जित मिळकत आहे. माझ्या वडीलांना तीन भाऊ होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांमध्ये व त्यांच्या भावंडांमध्ये वाटप झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांच्या नावावर असलेल्या क्षेत्रामध्ये माझ्या चुलत्यांचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट क्रमांक १४६ च्या पश्चिम बाजुस खैरी कॅनल आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांमध्ये व त्यांच्या भावंडांमध्ये जे वाटप झाले होते, त्यामधे माझ्या वडीलांना खैरी कॅनलच्या पूर्व बाजुचे क्षेत्र मिळालेले होते.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी सन १९९६ साली गट क्रमांक १४६ मधील मिळकतीचे मलिकार्जून वसंत जनकावळे यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखत ज्याचा क्रमांक १७२०/१९९६ केलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतान्वये मलिकार्जून वसंत जनकावळे यांच्या नावाची ७/१२ उताऱ्यावर फेरफारा नुसार नोंद झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर फेरफार नोंदीबाबत माझ्या वडीलांनी किंवा मी आजतागायत कोठेही दाद मागीतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नोंदणीकृत खरेदीखत ज्याचा क्रमांक १७२०/१९९६ बाबत माझ्या वडीलांनी व मी कोठेही दाद मागीतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ साली मी अज्ञान असून माझे वय अंदाजे ८ वर्षे होते. हे म्हणणे खरे आहे की, मी सन १९९६ साली वय वर्षे आठ चा असल्याने माझ्या वडीलांनी जो काही व्यवहार केला त्या संबंधी मला व्यक्तीश: माहिती नव्हती.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांना वाटपामध्ये सोनेगाव खर्डा रस्ता ते खैरी कॅनल पर्यंतचे क्षेत्र भेटलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ साली माझ्या वडीलांनी मलिकार्जून वसंत जनकावळे यांच्या नावे जे क्षेत्र खरेदीखतान्वये दिले ते क्षेत्र माझ्या वडीलांच्या ताब्यात होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखतान्वये मलिकार्जून वसंत जनकावळे यांनी सदर जमीनीचा ताबा घेतला. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी मलिकार्जून वसंत जनकावळे यांच्या नावे करुन दिलेले खरेदीखत हे उसणवार रक्कम परत केल्यावर जमीन परत उलटून देण्याचे ठरले होते, परंतु, त्यानुसार माझ्या वडीलांनी सदरचे खरेदीखत हे जमीन परत उलटून देण्याकरीता कोणत्याही न्यायालयामध्ये दाद मागितली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांना सन १९९६ साली झालेले खरेदीखत मान्य असल्याने त्यांनी कुठल्याही मा. न्यायालयात दाद मागीतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९६ साली माझ्या वडीलांमध्ये व मलिकार्जून वसंत जनकावळे यांच्यामध्ये झालेला व्यवहार हा उसणवार रक्कम परत केल्यावर जमीन परत उलटून देण्याबाबत होता.

**०५.** सन १९९६ साली दावा मिळकत ही बागायत असल्याने त्याचे त्यावेळचे बाजारमुल्य किती होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९६ ते २००० सालापर्यंत मलिकार्जून वसंत जनकावळे हे दावा मिळकतीचे वहिवाट करत होते. हे म्हणणे खरे आहे की, एखादया व्यक्तीने जर एखादया जमीनीचे खरेदीखत करुन घेतले असेल तर सदर खरेदीखतामध्ये जेवढे क्षेत्र नमुद केले जाते तेव्हढया क्षेत्राचा ताबा घेतला जातो. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ साली गट क्रमांक १४६ मधील जे क्षेत्र माझया वडीलांनी मलिकार्जून वसंत जनकावळे यांना विकले होते ते क्षेत्र सन २००० साली वादी व प्रतिवादी क्रमांक ०१ यांनी परत खरेदीखतान्वये घेतले होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सन २००० साली खरेदीखत हे माझी आई इंदूबाई सुदाम ढाणे व वादी हनुमंत परमेश्वर गंभीरे यांच्या नावे नोंदविले होते.

**०६.** सन २००० साली मी ११ वर्षांचा होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझया आईच्या नावे दावा मिळकत गट क्रमांक १४६ च्या मिळकतीचे खरेदीखत नोंदविले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २००० साली मलिकार्जून वसंत जनकावळे यांनी वादी हनुमंत गंभीरे यांच्या नावे ५० आर क्षेत्र व माझया नावे १० आर क्षेत्र खरेदीखतान्वये करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखतान्वये मी व वादी हनुमंत यांनी आमच्या नावावर असलेल्या क्षेत्राचा ताबा घेतला. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ५० आर क्षेत्राचा ताबा माझयाकडे असून १० आर क्षेत्राचा ताबा हा वादी हनुमंत यांच्याकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २००० साली झालेल्या खरेदीखतामध्ये वादी यांनी ५० आर क्षेत्राचा व मी १० आर क्षेत्राचा ताबा घेण्याबाबत नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हनुमंत गंभीरे यांना खैरी कॅनलच्या पूर्वेकडील ५० आर क्षेत्राचा ताबा दिला. सन २००० साली वादी व माझया नावच्या ७/१२ उताऱ्याला नोंद झाली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. गट क्रमांक १४६ मधील मिळकतीमध्ये सन २००० साली झालेल्या खरेदीखतानुसार वादी च्या नावाची नोंद ५० आर क्षेत्राकरीता व माझया नावाची नोंद १० आर क्षेत्राकरीता झाली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**०७.** माझे इयत्ता ६वी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला मराठी वाचता येते. मी सन २००९ साली सज्ञान झालो. मी सज्ञान झाल्यावर महसूल दप्तरी माझया आईच्या नावाची नोंद माझया नावासमोर अपाक म्हणून असलेली नोंद कमी करणेबाबत अर्ज दिलेला होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. सदर अर्जांन्वये माझया नावासमोर अपाक म्हणून असलेली नोंद कमी झाली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**०८.** आता मला निशाणी क्रमांक ०८ येथील गट क्रमांक १४६ चे ७/१२ उताऱ्याची मुळ प्रत दाखविण्यात आली, त्यामध्ये माझया नावासमोर १० आर क्षेत्राची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सज्ञान झाल्यानंतर माझया नावासमोर गट क्रमांक १४६ चे ७/१२ उताऱ्यावर

१० आर क्षेत्राची नोंद असल्याबाबत मला माहित झाले. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्रमांक ९४ आन्वये माझी व वादीच्या नावाची नोंद झाली. हे म्हणणे खरे आहे की, सन २००० साली झालेल्या खरेदीखतामध्ये वादीच्या नावे ५० आर क्षेत्र व माझ्या नावे १० आर क्षेत्र नमुद होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या खरेदीखताबाबत मी कोणत्या न्यायालयात दाद मागीतली नाही.

**(वादीच्या सुविदय वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.)**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/-

**(अनुश्री ब. फंड)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांक:- २७/०१/२०२६
ठिकाण:- जामखेड

**<u>(साक्षीदाराचा जबाब त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदविला)</u>**